# काव्य-केतकी

म. ग्रं. सं. ठाणे.
विषय काव्य
सं. क्र. 338

REFBK-0004718
REFBK-0004718

कवि
सोपानदेव चौधरी

संग्रह नं. १०७८
ता. ३१/१०/३२
६६८१

কাব্য
না. ৩৩৫

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे.

यास सप्रेम भेट ——

ता. २-१०-३२ सोपानदेव चौधरी

श्रीशारदा प्रसन्न

# काव्य--केतकी

कवि

सोपानदेव चौधरी

प्रकाशक

प्रो. पांडुरंग जिवाजी सबनीस

एम्. ए. एल्‌एल्. बी.

REFBK-0004718

REFBK-0004718

शके १८५४ ] नाशिक [ सन १९३२

प्रथमावृत्ति

किंमत {कापडी १ रुपया
{कागदी १२ आणे

मुद्रक
शंकर रामचंद्र दाते बी. ए.
लोकसंग्रह छापखाना
६२४ सदाशिव, पुणें.

[ सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन ]

या पुस्तकास शुद्ध स्वदेशी कागद वापरला आहे.

प्रकाशक
प्रो. पांडुरंग जिवाजी सबनीस
एम्. ए. एल्एल्. बी.
नाशिक

काव्य-केतकी



तुझेंच यश माउली!
तुजसि आज मी
अर्पितों.

नाशिक
२०-६-३२

तुझा
"सोपानदेव"

# प्रकाशकाचें निवेदन.

आपलें प्रथम अपत्य इतरांच्या हातीं देतांना पितृपदावर प्रथमच आरूढ झालेल्या तरुण पित्याला थोडीशी सलज्जता प्रतीत झाल्यास नवल नाहीं. अशा प्रसंगीं किंचित् अनिश्चित मनःस्थितींत असणाऱ्या पित्याच्या हातांतून तें बालक उचलून व त्याचा पापा घेऊन एखाद्या आप्तवर्गीय मध्यस्थानें जर तें बालक प्रेमी तिऱ्हाइताच्या स्वाधीन केलें, तर त्या तरुण पित्याला थोडें हायसें वाटतें असा अनुभव आहे. माझे मित्र श्री. " **सोपानदेव** " यांची " **काव्यकेतकी** " रसिकांच्या हातीं देतांना माझें काम वरील मध्यस्थाप्रमाणेंच आहे. या बालकाच्या रंगरूपाविषयीं रसिकांचें कांहींही मत बनो, ते त्याचा एक तरी गोडसा पापा घेतल्याशिवाय राहणार नाहींत अशी मला खात्री वाटते; व हा पापा त्यांच्या रसिक मनाला खचित आल्हाद देईल असा मला भरंवसाही वाटतो.

पुस्तकप्रकाशनाच्या कामीं श्रीमती **मदनबाई छापवाले** यांनीं द्रव्यसहाय्य केलें त्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें.

रसिकांचा नम्र

**पांडुरंग जिवाजी सबनीस.**

प्रकाशक.

# हृद्गत

ज्याचे त्यालाच परत देतांना प्रस्तावनेचा गाजा-वाजा कशाला ? आणि प्रस्तावनाकारांच्या मशा-लीच्या प्रकाशांत मी रसिकांच्या भेटीस येऊन तरी असा कोणता नजराणा पुढें करणार आहें ? प्रस्ता-वनेचा प्रतिष्ठित मार्ग टाळण्याच्या प्रवृत्तीच्या मागें माझा अभिजात संकोच जसा कारण आहे, तसाच किंबहुना अधिकच माझा अधीरपणाही कारण आहे. रसिक मित्रांच्या भेटीकरितां इथून तिथून सारे कवी अधीरच! हा तर नित्याचाच अनुभव !!

कविमित्रांच्या गोड सहवासांत काव्यवीणेच्या झंकारांतील काव्यकल्पना, काव्यदर्शन आणि काव्या-नंद या चढत्या तारांचें स्वरज्ञान जसजसें होऊं लागेल, तसतसें जिज्ञासू, श्रोता व अभ्यासू असा कोणीही "सोपानदेव" काव्यवीणेच्या तारा स्वतः छेडण्याचा प्रयत्न करून शारदामाईच्या अंकावरील खेळकर कविबाळांच्या भाग्याचा वांटेकरी होण्याची कां इच्छा करणार नाहीं ?

विश्वाच्या अनंत सुरांत आपलाही सूर लाव-ण्याचा कवीचा प्रयत्न आणि त्याच प्रयत्नाच्या पोटीं

सांठविलेल्या यशाचा आनंद दुसऱ्याजवळ व्यक्त करुन तोच आनंद द्विगुणित करण्याचा कवीचा स्वभाव—व्यवहारी भाषेंतील 'अधीरपणा'—हा गुण कां दोष ?

दुनियेच्या अखंड घडामोडीच्या घाइंत नित्य नव्यानवलाईचें सौन्दर्य लुटतांना व लुटवितांना जिवाच्या अधीरवृत्तीचें रहस्य एक रसिकच समजूं शकतील.

संकोचाच्या घरट्यांतून नुकतेंच बाहेर पडणाऱ्या एका लहानग्या पांखरानें जिवाच्या घाईनें केतकी बनापर्यंत दौड मारून, चिव चिव करणाऱ्या आपल्या चिमुकल्या चोंचींत एकादें केतकीचें पान धरून, तें जिवाभावानें रसिक-चरणीं अर्पण केलें तर " हें **काय पाखरूंच लहान आणि केतकीचें कांटे-रीच पान !** " याचा स्वीकार करावा किंवा करूं नये ! अशी संकुचित विचारसरणी रसिक मनाला शिवणार नाहीं ना ?

**—सोपानदेव चौधरी**

**नाशिक**
ता. १७-४-१९३२


# अनुक्रमणिका


| कविता | | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ स्फूर्तिदेवतेस.... | .... | .... | १ |
| २ संगीत आणि चित्रकला | .... | .... | ४ |
| ३ इषारा .... | .... | .... | ७ |
| ४ भाग्यवान भिकारी | .... | .... | ९ |
| ५ उत्कंठा .... | .... | .... | ११ |
| ६ सनातनी समता | .... | .... | १४ |
| ७ भारतभाग्य-विधाता | .... | .... | १५ |
| ८ देवाच्या दारीं | .... | .... | १६ |
| ९ मोहिनीस .... | .... | .... | १९ |
| १० गोकुळिंचा कान्हा | .... | .... | २१ |
| ११ वाजवूं नको माधवा | .... | .... | २३ |
| १२ हंसण्यांत मजा नाहीं | .... | .... | २५ |
| १३ वाद्याची वनिता | .... | .... | २७ |
| १४ प्रतीक्षा .... | .... | .... | २८ |
| १५ अवचित भेट | .... | ... | ३० |
| १६ एक नवल.... | .... | .... | ३१ |
| १७ चि. कमलेस | .... | .... | ३२ |
| १८ पहांट तारा | .... | .... | ३४ |
| १९ दोन्हीकडे एकच दृश्य | .... | .... | ३५ |

| कविता | | पृष्ठ |
|---|---|---|
| २० बलभीम .... | .... | .... ३७ |
| २१ कुणासाठीं? | .... | .... ३८ |
| २२ चि. शरच्चंद्रास | .... | .... ४२ |
| २३ नाइलाज .... | .... | .... ४८ |
| २४ पिचकारी.... | .... | .... ५१ |
| २५ तो दिवस | .... | .... ५३ |
| २६ गोड समजूत | .... | .... ५४ |
| २७ देवाची गत | .... | .... ५६ |
| २८ अक्षय्य तृतिया | .... | .... ५८ |
| २९ स? .... | .... | .... ६० |
| ३० कशाची संक्रांत | .... | .... ६२ |
| ३१ मळयांत जातांना | .... | .... ६४ |
| ३२ लाजे नभीं चंद्रमा | .... | .... ७० |
| ३३ प्रेमसंगम.... | .... | .... ७२ |
| ३४ रणमर्द शाहिरास | .... | .... ७५ |
| ३५ लढाईवर जातांना | .... | .... ७६ |
| ३६ प्रेम आणि परमेश्वर | .... | .... ७८ |
| ३७ बंदिशालेंत | .... | .... ७९ |
| ३८ हळदीघाटाचें युद्ध | ... | .... ८१ |

# काव्य-केतकी

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ६६५१



कवि

सोपानदेव चौधरी.

श्रीशारदा प्रसन्न

# काव्य–केतकी

६६८७

स्फूर्तिदेवतेस ( वृत्त–माळीण )

रूप नसे चित्तीं
तुझें तें रूप नसे चित्तीं,
मग कशी अचानक जडली सखये
प्रीती तुजवरती.

* *
*

गोड मनोवृत्ती
तुझ्या त्या गोड मनोवृत्ती,
नवप्रेमाचा नित पिंगा घालुनि
हृदय खेळवीती.

४७९८.

(चाल) ही प्रतिभा गाते गुणगायन सर्वदा,
तव थोर मनाची उधळित धनसंपदा,
ती कीर्ती नेइल साम्राज्ञीच्या पदा,

* *
*

काय तुला कमती !
सखे मग काय तुला कमती !
ये अशी मजसवें चढावयातें
विभवगिरीवरती.

* *
*

मम आशापूर्ती
हीच बघ मम आशापूर्ती
तें निराशेचें पटल सारुनी,
येइ जरा पुढती.

* *
*

भेट नसे पुरती
अजुनिही भेट नसे पुरती
मग कशी सांठवूं मम हृदयांतरि
तव प्रेमल मूर्ती.

(चाल) तव मूर्तिवांचुनी ध्यान धरूं मी कसें ?
हे चर्मचक्षु तर अधीर झाले असे,
येईल तुला या अधीरतेचें हंसें.

* *
*

हांस सखे नुसती
अशीच तूं हांस सखे नुसती,
त्या हांसण्यांत मम गौरव भरला,
आणिक तव प्रीती.

नाशिक, ता. १४–१२–१९३०.

## संगीत आणि चित्रकला (चाल-प्रिय प्रेरणे थांब)

प्रात:कालीं कुणी बालिका शिंपित होती सडा,
श्रवणिं ये शिपक्यांचा सडसडा;

त्यास द्यावया साथ सुराची ताल धरुनि केरवा
करितसे ' सूं सूं सूं ' या रवा;

यांत भरीं घातला करींचा मंजुल कंकणरव,
करी त्या गाण्याचा गौरव;
(चाल) पायांत तोरड्या छुमछुम करिती पहा,
मधुमेळ मिळाला त्या लयकारींत हा,
कीं स्वर्गिं चालला नाच देविचा, अहा !
नयनमनोहर नाच दाखवी, नाचुनि बाला स्वतां
नाचवित रसिकांची रसिकता. १

नाच पाहुनी वेड साच हें नच संपे जीविचें,
शिंपणें केव्हां संपायचें ?
नृत्य संपलें त्यांतच तें संपलें सडा-सिंचन,
भरुनियां गेलें सर्वांगण;
करितां दृष्टिक्षेप त्यावरी आनंद मनीं भरे,
श्रमाचें सार्थक झालें खरें.

(चाल) "मज गमतें बाई ! जणूं अंगणावरी
पसरिलें खरोखर वस्त्रच हें तपकिरी"
बोलली बालिका आनंदाच्या भरीं;
हौसेनें मग काढुं लागली रांगोळी त्यावरी,
सजविली निजकृति अपुल्यापरी. २

प्रथम काढिली कसलीशी ती कमलाची 'स्वस्तिका'
राहिली स्वस्थ जरा बालिका;
ओंठ खालचा दांताखालीं नजरहि खालिंच करी
चालला विचार कसला तरी;
नजर असे ती निरीक्षणाची; निरखुनि वरचेवरी
परीक्षण रांगोळीचें करी;
(चाल) मग नकारतेची मान तिनें हलविली,
चटदिशीं करें रांगोळी पुसुनि टाकिली,
त्यायोगें मनिंची उत्सुकता वाढली,
मम उत्सुकते ! नको उताविळ होऊं इतुकी गडे !
पाहि तूं होणारें जें घडे. ३

दुसरें कांहींतरी काढुंया नको अतां 'स्वस्तिका''
पुटपुटे स्वतांशींच बालिका;
चतुष्कोण 'पुष्करिणी' फुलांची कां साधी'कोयरी
'कोयरी' कमळाची गोजिरी !

वेलीची ' कोयरी ' काढुं कां; ' तुळशीवृंदावन '
अथवा ' सांखळिचें आसन '
(चाल) परवां काय बरें ! ' शेवंतीचें फुल '
कालशी काढिली ती ' तेलंगी भुल '
मग 'नाभिकमल' हें आज काढुंया तर
' नाभिकमल ' रंगीत छान हें फार फार आवडे,
मला तर मनापासुनी गडे ! ४

रांगोळ्यांचे केव्हांपासुनि विचार केले तरी,
कितिक ते गेले वाऱ्यावरी;
काढुं लागली तर्यीं भराभर रांगोळ्या अंगणीं,
नव्या वरचढी रोजच्याहुनी;
' गांठोडें ' काढिलें गांठिलें जयांत माझें मन
ठेविलें प्रेमभरें बांधुन;
(चाल) तो 'चक्रव्यूह' जणुं हृदयांगणिं रचियला
मन्मनोऽभिमन्यू त्यांत पुरा अडकला,
बाहेर निघाया युक्ति नाहिं त्याजला,
धन्य बालिके! धन्य चतुरिके! शिकलिस गे, कोठुन
द्रोणाचार्यांची शिकवण ?

पंचवटी, ता. २१-१०-१९२६

## इषारा

झोक तोल, तोल, तोल, ग, आडाचं पाणि लइ खोल !

आईला आनंद द्यावया,
मनापासुनी करिशी सेवा,
विसरुनि जाशी अपुल्या जीवा
कष्ट तुझे बिनमोल ग, आडाचं पाणि लइ खोल.

रहाट, कप्पी नसति साधनें,
पाणि काढिशी दो हातानें
कोठवरी तूं अशा रितीनें
जीव दमविशी बोल ग, आडाचं पाणि लइ खोल !

ओढुनियां पोहरा भराभर
कडेवरी आडाच्या भयकर,
आधार नसे कसला लवभर,
जाइल मध्येंच झोल ग, आडाचं पाणि लइ खोल !

भय--सूचक हा ध्वनी कशाचा ?
ऐक गडे, पडसाद तयाचा,
यमरायाच्या दरबारींचा
वाजतसे बघ ढोल ग, आडाचं पाणि लइ खोल. !

क्षण--भंगुर हें जीवित बाई,
निघावयाची करितें घाई,
चंचलतेला सीमा नाहीं,
उडेल बघ चंडोल ग, आडाचं पाणि लइ खोल !

महंत साधु गेले सांगुनि
बोल तयांचे मनांत आणी
बोलत नाहीं वेड्यावाणी
उगाच अपुला फोल ग, आडाचं पाणी लइ खोल !

जळगांव, ता. १९–२–१९२८



## भाग्यवान भिकारी (चाल–असा धरिं छंद)

भूल मनाला; हा कोण भिकारी आला? धृ०

झोळी दिसते अगदीं खालीं
खालीं कसली? अखंड भरली
भिक्षा देतां स्वतां पाहिली
काय ही लीला! हा कोण भिकारी आला!

इतर भिकारी दारीं येती
केविलवाणें तोंड करीती
परंतु याची गंभिरवृत्ती
खिळे नयनांला; हा कोण भिकारी आला

'भिक्षांदेही' मुखीं निघेना
'मना सज्जना' श्लोक म्हणेना
लोक आदरें देती दाना
येइ मनाला; हा कोण भिकारी आला!

भिकार वस्त्रें अंगीं नाहीं
दैन्यावस्था स्वप्नीं नाहीं
श्रीमंतीचा लेश नसेही,
जादूवाला; हा कोण भिकारी आला!

जीवन व्हाया हें सुखकारी
कुणी कुणाच्या जावें दारीं
जग हें आहे सर्व भिकारी
पटवि मनाला; हा कोण भिकारी आला !

नवें नवें सुख मिळण्यासाठीं
सदा भांडते मानवजाती
भांडुनि मिळतें काय संप्रती
सौख्य जिवाला ? हा कोण भिकारी आला !

दान करा हो अपुल्या हातें
अमोल जें देणें द्यायातें
उठा उठा धर्माचे दाते
भिक्षा घाला; हा कोण भिकारी आला !

धर्म एक परि नाना जाती
पंथ किती त्यां नाहीं गणती
माळ तयांची गुंफोनी ती
कंठीं घाला; हा कोण भिकारी आला !

नव्या जुन्याचें मंथन करुनी
सार तयाचें द्यावें काढुनि
भिक्षा असली अमोल वाढुनि
सुखवा त्याला; हा कोण भिकारी आला !

नाशिक, ता. १९–११–१९२७

संग्रह १०५८
२१।१०।५८

## उत्कंठा—

( शा. वि. )

वाले ! पाहुं नको अशी मजकडे
तूं चोरटया दृष्टिनें,
नाहीं मी रचणार काव्य तव तें
सौंदर्य पाहुनियां;
केलीं आजवरी कितीक कवनें
गाया कवींनीं तरी,
गाती आजहि माधुरी मधुरशा
रूपास मोहूनियां.

* * *

कोणी वांच्छिति व्हावयास तुझिया
अंगांतलीं भूषणें,
कोणी वांच्छिति व्हावयास गजरा
नाजूक वेणींतला.
‘ माझी होशिल कां?’ म्हणूनि झुरती
कित्येक उच्छृंखल,
कोणी भाविक संत पूजिति तुला
देवीच संबोधुनी.



मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ६५०९

तूं काव्यांतिल मूर्तिमंत पुतळी
देवी असो वा कुणी
जीवाची मम एक आस उरली
पाहून बाले ! तुला,
ज्याची होशिल तूं खरी कुलवती
मैत्रीण गे जन्मिची,
केव्हां पाहिन? त्या नरास सुभगा
उत्सूकता ही मला !

* * *

सद्भाग्यें जर योग्य जोड तुमची
नांदेल या भूवरी,
अंतीं एकच मागणें तुजकडे
आनंद हा वाढवी;
जेव्हां येइन मी चुकून सहजीं
गेहीं तुझ्या चालुनी,
बाले ! दोनच गोड शब्द मजसी
बोलून संतोषवी.

( आणि तुला योग्य जोड न मिळेल तर ! )


आणावें न मनीं, परंतु मन हें
पाण्याहुनी चंचल,

स्वर्गींची कुणि पुष्पवृष्टि तुडवी
नादान पायातळीं !

ढाळावे मग अश्रु लोचनिं गडे !
पाहूनि मी दृश्य हें

दुर्दैवें लतिका चुकूनि पडली
वृंदावनाच्या गळीं.

पुणें, ता. ३–९–१९२८



## सनातनी समता ! (शा. वि.)

वाटे अंतरिं सर्व मानव अम्हीं
देवा तुझीं लेंकरें,
एकाकीं मज तोंच येइं श्रवणीं
वाणी कुणाची खट !
शेंडीची उडवीत गांठ, हिसका
मानेसही देउनी,
" बाजूला चल दूर हो शिवुं नको "
बोले कुणी कर्मठ.

झाली आग अरे ! अरे ! मरणही
वाटे बरें याहुनी,
ऐकोनी कटु शब्द ते मम मनीं
झाल्या अती यातना;
बापा ! धर्म सनातना ! म्हणविशी
तूं श्रेष्ठ सर्वांहुनी,
सर्वांना प्रिय ती तुझ्यांत समता
आहे कुठें सांग ना ?

## भारतभाग्य–विधाता* ( शा. वि. )

[ कै. वा. गुरुवर्य श्रीमान् पंडित विष्णु दिगंबर पलुस्कर
(गायनाचार्य) यांना उद्देशून]

गानांच्या लहरी क्षणांत विरल्या
कोठें नभोमंडलीं ?
भक्तीमौक्तिक अश्रुबिन्दु बनले
रत्नाकराच्या तळीं,
कंठाची तर वर्णवे न अजुनी
कोणासही माधुरी,
प्रेमानें परि रामनाम उठवी
रोमांच अंगावरी.
नादब्रह्म तशीच पूर्ण भरली,
भक्तीसुधा गायनीं,
मोदानें श्रुति राममंत्र जपती ;
सप्तस्वरांच्या मनीं.
नित्याच्या नव जन्म वा मरण या
सांडूनि साऱ्या रिती,
मृत्यूनें जगुनी स्वतां जगविलें
त्या गान विद्येप्रती.

---

*सदरहू कविता ता. २९ सप्टें. १९३२ च्या केसरींत 'भारतीय गायनाचार्य' या मथळ्यानें प्रसिद्ध झालेली आहे.

## देवाच्या दारीं

( वृत्त–दिंडी )

आज रामाचा जन्म दिवस येई,
मंदिरीं जाया उडत एक घाई,
रामनवमी पातली चैत्रमासीं,
म्हणुनि गेलों प्रभु रामदर्शनासी.

एकतारीचा सूर येइ कानीं,
ताल चिपळयांचा रंग देत गानीं,
मुखें गर्जत ' जय रामकृष्ण हारी '
एक चोखा देखिला महाद्वारीं.

गोड तुकयाचे गाउनी अभंग
रामभजनीं जाहला पुरा दंग,
खऱ्या भावाचा विमल भक्तिप्रेमा,
फोडि टाहो ' जय दाशरथे रामा. '

घालि लोटांगण भजन संपवीलें,
स्वतांभंवतीं मग प्रदक्षिणा चाले,
मजकडे तो फेंकिता दृष्टिक्षेप,
मुदें वदला ' जोहार मायबाप. '

म्हणे दादा तुम्हि फार भाग्यवान
तुम्ही ब्राह्मण मी असे हीन दीन,
अभाग्याची या विनंती तुम्हाला,
प्रभूकंठीं हा हार एक घाला.

'हार चोख्याचा' वदा हेच बोल,
पुजारी जरि केरांत टाकतील,
कापुराची ही ज्योत लावुनीयां,
राख हृदयाची वहा रामराया.

फिरुनि गर्जे तो 'रामकृष्ण हारी'
करुण वाणी मम बैसली जिव्हारीं,
हळुंच वदलों मी "तूंच जाइ आंत,
देवभक्ताला काय जातपात ?"

"काय भलतें बोलतां मायबाप ?
कुठें फेडूं हें मूर्तिमंत पाप ?"
वदुनि दीनवचें अश्रु दोन ढाळी,
"असें नाहीं होणार कदाकाळीं."

"मंदिराचीं अंगणें झाडण्याचें,
लाभलें हें मज वतन वैभवाचें.
वाडवडिलांचें पुण्य सांठलेलें
कसें फासूं मी आज त्यास काळें ?

भक्तिभावें म्यां करुनि नमस्कार,
प्रभूकंठीं घातला पुष्पहार.
कर्पुराच्याही ज्योति लावुनियां,
धूर त्यांचा वदतसे रामराया.

“ कितिक पापी जन मंदिरांत येती,
लोकलाजेस्तव रामनाम घेती,
तुझ्या भेटीची आस जया भारी
खरा ब्राह्मण तळमळे पहा दारीं.”

नाशिक, ता. ९–४–१९२९



## मोहिनीस.

तूं अशीच निशिदिनीं टाकी गडे, मोहनी
मजवरी टाकी गडे, मोहनी । धृ० ।

मेघांच्या बाहू-पाशांतुनी
जशी दामिनी जाई निसटुनी,
दृष्ट कुणाची लागे म्हणुनी
गेली कशी छेडुनी, चकाकत,
गेली कशी छेडुनी.

* * *        * * *

नको तुझी ती अखंड सोबत,
अशीच मजला जाई छेडित,
यांतच सारी भरली गंमत,
अशा सुखाचा धनी, होईन मी
अशा सुखाचा धनी

* * *        * * *

प्रीतीचा मग रोग कशाचा ?
योग नसे, हटयोग कशाचा ?

शुभ मरणाचा लाभ कशाचा ?
आशा धरावी कुणी ? भलतिच
आशा धरावी कुणी.

* *

प्रेम आंधळें, जणूं भिकारी
तशीच घेई सारंगी करिं,
भिक्षा मागत तुझिया दारीं,
खुल्या दिलाचीच ना ? आळवुनी
खुल्या दिलाचीच ना.

* *

देउनियां मज अपुरें दर्शन,
चित्त घेतलें सगळें चोरुन,
कधीं फेडशिल प्रेमाचें रिण,
ठेविं गडे त्वन्मनीं, स्मृती ही
ठेवी गडे त्वन्मनीं.

पंचवटी-नाशिक, ता. १२-८-१९३०

८८७१.

## गोकुळिंचा कान्हा.

( राग—सारंग )

गोकुळिंचा कान्हा कोणी पाहिला कीं काय ग ?
गोकुळिंचा राणा माझा देखिला किं काय ग? ॥धृ०॥

जमूनेचं पाणी सगळं
किती बाई, काळं काळं !
प्रभू चिंतनानें जमुने, काळि पडलि काय ग ?

प्रभू सांवळा हा कृष्ण,
रंग तुझा झाला कृष्ण,
कृष्णनाथ लपवुनि पोटीं ठेविला किं काय ग ?

सांग गडे जमुना माई,
संशयास जागा राही,
तूंच ऐशि केली, बाई, कारवाइ काय ग ?

सर्वे घेउनी ब्रिजनारी
खेळगडी कुंजविहारी
कुंजवनीं गोपींसंगें खेळतो किं काय ग ?

गुंतलासि कवण्या ठायां ?
येइ तुला मी धुंडाया,
ठायिं ठायिं, तूं, यदुराया, धुंडूं तरी काय ग ?

चोरियलें माझें चित्त
देवपणा वरि मिरवितां !
देवपणा कळला पुरता, बोलुं तरी काय ग ?

येइ मला चाहुल कानीं,
दिसे अतासें हें कोणी,
लताकुंजि लपुनी छपुनी, पाहतो किं काय ग ?

हसूं नका पुष्पलतांनो,
सृष्टिदेविच्या छकुल्यांनो
कृष्णसखा जवळी म्हणुनी, वेडवितां काय ग ?

वेडिपिशी मजला म्हणतां
तुम्हासवें बोलत असतां,
माझि मला बोलायाची, चोरि झालि काय ग ?

नको नको थट्टा असली,
शर्थ अतां बाई, झाली,
कुठें तरी तो वनमाली, देखिला किं काय ग ?

---

## वाजवूं नको माधवा ( सवाई मनमोहन )

वाजवूं नको माधवा तुझी ती जादूची मधु मुरली.
गोपगोपी धन्य झाले
पिऊनियां ते प्रेमप्याले,
त्या गोड भावना आज निमाल्या कलिरायाच्या कालीं

मुरलि गानाची रसिकता
काय जाणें दीन जनता !
संसारयातनांचीं रडगाणीं गातां गातां शिणली.

मुरलि नादाची मधुरता
काय जाणे मत्त जनता !
बांगडी आणि कल्दार[1] याच वाद्यांच्या नादीं मुरली.

मुरलिनादीं लीनमतिता
काय ठावी ढोंगि संतां !
हे तुझ्या नांवचा शंख फुंकुनी हातीं घेती झोळी.

ध्यान धरुनी ध्याति तुजला,
मूर्तिचा तव विसर पडला,
जय रामकृष्ण हरि भजन होत परि अंतरिं भूतें शिरलीं

---

१ रुपया;

गाउनी तव मुरलि—गीतें
चित्तशुद्धी काय होते ?
हे कवि स्वतांच्या नांवांची बघ पुंगि वाजवितिखालीं[२]

रडें येई, अश्रु नाहीं;
हास्य येई, मोद नाहीं
चहूंकडे पहा तव प्रीतिविना शरिरांचीं प्रेतें बनलीं.

दाखवाया ढोंग अजुनी
ह्यावरी भूतेंच बनुनी
हीं पहा पुनरपी स्मशानांतलीं गाणीं गातां रमलीं.

कठिण ऐशा घोर काळीं
वाजविशि कां व्यर्थ मुरली ?
छेनकोनको! त्या गोपगोपि तुज हंसति गालिंच्यागालीं

विनवण्या माझ्या जिवाच्या
—लहरि मुरली--वादनाच्या—
ध्वनिलेखक--यंत्राच्या आधारें उठल्या ज्या हृत्पटलीं.

नाशिक, ता. ७—१२—२७

---

२ व्यर्थ.

## हंसण्यांत मजा नाहीं (गझल)

वद प्रेम बोल आतां, हंसण्यांत मजा नाहीं.
भासवी जादूगिरी तव
हांसण्याची माधुरी,
सांग कैसा बैसवीते
घाव हा माझ्या उरीं,
बसला जरी जिव्हारीं, तुजला हंसेंच येई

दिल्रुबा घेऊनि बाले !
तूं दिलाचा निजकरीं
वादनाची कोण घाई
जाहली तुजला तरी !
बघ तार छेडतांना, ऐशी तुटोनि जाई.

दोन जातां पाउलें तूं
तीन मुरके मारिशी,
त्याच ठिणग्या फेंकुनीया
जीव अर्धा जाळिशी,
प्रणयी कसा जगावा ? झणिं ठार मात्र होई.

प्रेमले ! उधळूनी ऐशीं
गोड हास्याचीं फुलें,
कैक ते प्रणयी सदा
झुरणीस तूं लावीयले,
रडशील धाई धाई, हंसण्यांत मजा नाहीं.

ध्यान वा तप लाविलें
उधळूनि तूंच दिगंतरीं,
तीच जादू सांग कैशी
फोल मानूं मी तरी ?
ज्या दिव्य मोहिनीला, भुलले ऋषी मुनीही.

ये अशी माझ्यासवें, कर
देउनी माझ्या करीं,
सोडुनीया सर्व चाळे
प्रेमगोष्टी तूं करी,
प्रणयी जिवांस सांगूं, अपुली नवी नवाई.

मुरार–ग्वाल्हेर, ता. २७–७–१९३१.

---

## वाद्याची वनिता

( चंद्रकान्त )

मला वाटते गानदेवता वनिता वाद्याची
प्रणयसुखाची आशा करिते मधुरस पानाची;

वाजतसे दिल्रुबा, घेई ललकारी तानांची,
परंतु त्याला प्यास लागली सुस्वर गानाची;

तानांची ती धून ऐकुनी गानदेवि ललना
नीतीच्या बुरख्यांत लाजतां दिसली या नयनां;

मोह नावरे, गानाचें मग वेड तिला भरलें,
भान विसरली, लाजणेंहि तें सहज ठार झालें.

गाउं लागली तयासवें ती कवनें प्रेमाचीं,
प्रणयसुखाची आशा करिते मधुरस पानाची.

* * *

मनमोहन वाजवी अल्गुजा तान–अलापांनीं
गोड लहरि त्या जाती सांगा कवणाच्या कानीं ?

प्रेमाचीं शोधुनी मंदिरें करिती त्या भजन,
कवणाच्या हृदयांत गाउनी बनल्या मधुगान ?

प्रेमगान गाउनी त्यासवें करावया नाच
कुंजवनींच्या गोपी बनल्या गानदेवताच.

नाशिक, ता. ७–६–१९२५

## प्रतीक्षा

राग–खमाज (लावणी)

मी झुरत सदा अंतरीं, नाथ कधिं येतिल गे मंदिरीं.

पहिला विरहाचा तो दिन
छे नको त्याचि गडे अठवण,
लांबवी विरह असा दारुण
मजहुनी गमत चकोरी बरी. नाथ कधिं येतिल–

* * *

वाजतें हलुंच कुठें पाउल,
तीच हो श्रवणांची चाहुल
पडे कां अशी मनाला भुल
झालि गत चुकल्या हरिणीपरी, नाथ कधिं येतिल–

* * *

पारवा उडत येइ घाइंत.
पत्रिका नसे परी चोंचित
आस ही होती मज वाटत
कळावी ख्यालिखुशाली तरी, नाथ कधिं येतिल–

सुमांची सुकली माला तरी
जयाच्या रुळली वक्षावरी,
सवत जी गमली गे क्षणभरी,
घेउं कां कुरवाळुनि तिज उरीं, नाथ कधिं येतिल-

* * *
* * *

जाहलें उत्सुक मी दर्शना,
सारखी हुरहुर वाटे मना,
कुठवरी बसूं सखे सांग ना ?
घोर दिन मोजित बोटावरी, नाथ कधिं येतिल-

* * *
* * *

होउं कां शेवट हा साजणी!
हुरळत्या प्रेमि जिवाचे धनी
जोंवरी येतिल गे परतुनी,
राहते उभीच सज्जावरी, नाथ कधिं येतिल-

नाशिक, ता. ७-४-१९३२

## अवचित भेट

(चाल–भूपती खरे ते)

दिनभरी भागुनी दिनकर अस्ता जाई,
मी तसाच मार्गी चालत होतों पायीं,
मज मुळींहि नसतां संकल्प मनीं कांहीं,
कुणि समोर रमणी अवचित जवळी येई;
तिज वाट द्यावया वळलों मी बाजूला,
झणिं तीहि बिचकत वळे त्याच बाजूला,
जिकडे मी जाई त्याच दिशेनें तीही
करितसे मार्ग मोकळा, किती ती घाई ?
गोंधळून मीही वाट देतसे तिजला,
परि तीच येतसे पुन्हां आड वाटेला ;
बघुनियां झटापट मनीं वाटलें साच
जणुं खेळ चालला आटयापाटयांचाच !

(चाल)मी चमत्कारयुत हास्य आंवरी !
मज कसेंसेंच तें झालें अंतरीं
मग तसाच मार्गी ठेलों क्षणभरीं,
परि काय तरी हें घडलें हो भलतेंची !
गडबडींत झाली भेट एकमेकांची !

* * *

मग त्वरित निघे ती गोड हास्य उधळीत,
तें सुहास्य अजुनी खेळतसे हृदयांत.

पुणें, ता. २२–२–२७

## एक नवल

( चाल-वीरा भ्रमरा )

परमार्थाच्या सुस्वर गानें भजनीं मन रंगलें,
नवल हें आज एक पाहिलें.

प्रेममंदिरीं गात हरीची प्रेमें प्रेमारती,
गुंगवी कोण अहा मन्मती.

मंदीरांतिल मूर्तिच घेउनि चिपळ्या एका करीं,
भजन मग कोणाचें ती करी ?

(चाल) कुणि म्हणती तिजला मुर्दे मदनमंजरी,
कुणी संबोधीती लक्ष्मी अवनीवरी,
कुणि वदे पार्वती रमते गिरिकंदरीं,

स्त्रीरूपानें चकवाया मज आले कां श्रीहरी,
गूढ हें वाटे हृदयांतरीं.

पंचवटी–नाशिक, ता. ९–१–३२

## चि. कमलेस-*

बघतां कमे तुला गे,
मनिं येत बोल हाची,
वदतों सदा कदां मी
'कमला कशी गुणाची.'

जेव्हां फुटेल वाचा
वदशील बोबडेच,
बिनमोल बोल आम्हां
देतील मोद साच.

तव बोबडया सुराची
नामी मिळेल जोड
धरि ताल पैंजणाचा,
शिशु गीत गाइ गोड.

तव हास्य गोड माझ्या
सांगे खुळ्या मनास,
" कां तूं उदास बसशी ?
कार्या करूनि हांस "

तव शांत धीर ध्यान
शिकवी जिवा अधीर,

---

*चि. कमल पेंडसे

‘ दुःखें कितीहि आलीं ,
सोडूं नकोस धीर ’
“ समदृष्टि ठेव जगतीं
बांधूनि खूणगांठ, ”
निष्पाप नेत्र तव हा
देतात नीतिपाठ.
तव स्वैर खेळणें हें
शिकवी अम्हासि मंत्र :
‘म्हणि हो असा स्वतंत्र,
करीं मायभू स्वतंत्र .
पाहूनि देवपण हें
भक्ती मनांत दाटे ,
तव बालरूप मजला
जणुं देवताच वाटे.
सहवास ज्या तुझा गे
ठरलेच भाग्यवंत .
यशवंत बंधु आणि
तैसाचि तो अनंत.
अर्पीत भक्तिभावें
तुजसाठिं पुष्पमाला,
कमले ! तुझ्या जिवाच्या
माई “सरस्वतीला.”

पंचवटी–नासिक.

## पहांट तारा

(चाल–भूपति खरे ते)

उगवली प्रभातीं कुणी तारका छान,
लाविलें गावया आज तिनें हें गान
कशि निघे शुक्रचांदणी लेवुनी साज,
शुभ शकून झाला भाग्याचा कां आज !
कां उषादेविनें अशा गोड समयास
प्रिय सखीसवें धाडिला प्रेमसंदेश !
त्या नभोमंडळीं लुकलुकणारा तारा
कां मजेंत अवनीवरतीं येत विहारा !
( चाल ) हे मानव इहलोकींचे वांच्छिती,
देवही स्वर्गलोकींचे याचिती,
या तेजोमय ताऱ्याला लक्षिती,
विभवाचा हेवा असा एकमेकांत
चालला कधींचा नसे तयाला अंत.

मुरार–ग्वाल्हेर, ता. ३–७–१९३१.

## दोन्हींकडे एकच दृश्य ! ( शा. वि. )

होता खेळत चंद्र हांसुनि मघां
स्वच्छंदसा अंबरीं,
एकाकीं परि अंधकार बनुनी
झाली निराशा पुरी;
मेघांनीं पुरताच जाइ गगनीं
झांकूनियां चंद्रमा,
केव्हां पूर्ण पहावया पुनरपी
लाभेल ही पौर्णिमा.

* * * * * *

झालों उत्सुक फार तिष्ठत बसें
मी दर्शनासी तुझ्या,
मेघाआडुनि मात्र तूं बघशि ना !
साऱ्या जगाची मजा,
दुर्दैवें अति अंधकार पसरे
पाऊस ये सारखा,
मायेचा बुरखाहि तो तव सखे,
झाला मला पारखा.

जैसा या बुरख्यासि घेउनि शशी
लोपे नभीं या क्षणा,
तैसा त्वां मुखचंद्रमा लपविला
कां बालिके ! सांग ना ?
देवानें दिधला अमोलिक गडे !
सौंदर्यठेवा तुला,
रूढीच्या तव पोतडींत म्हणुनी
कोंडून कां ठेविला ?

*  *

ऐकूनी मम बोल हे, ढळढळां
बाला रडूं लागली
जी रूढी तिज घालि अज्ञ बुरखा
मी पूर्ण धिःकारिली.

जळगांव, ता. २३-११-२८.

## बलभीम

( अभंग )

जीवीत हें असें क्षणभंगुरसें,
परि झाला असे चिरंजीव.
शरीर कोमल मूर्तिमंत जरी,
तेंही झालें परी महावज्र.

"माणूसकी येणें कठीण नरास,
आलें वानरास देवपण"
रामाचिये पायीं देह वाहियेला,
म्हणूनियां झाला बालभीम.

बालभीम तेज आंगीं बाणवावें,
स्वतंत्र करावें मायभूला.
सांठवावा सदा हृदीं हनुमान,
आणावें जीवन निर्जीवाला.

---

## कुणासाठीं ?

(चाल- कुठल्याशा जागीं देख)

अतिरम्य एक फुलबाग
फुललेली जागोजाग पाहिली.
चमकली कोणशी तींत,
स्वच्छंदें गुण गुण करित, बालिका.
वनदेवी मजला गमली,
फुललेल्या झाडाजवळी, बालिका.
परडीतें घेउनि हातीं,
सुमनांना तोडित होती, बालिका.
तीं रसिक जनांचीं सुमनें
सुमनांसम तोडित होती, बालिका.
हृदयाची करुनी परडी
सुमनांनीं सजवित होती, बालिका.
फुलबागेंतिल सुमनांनीं
परडीला सजवित होती, बलिका.
त्या प्रसन्न वातावरणीं
तल्लीन जाहली होती, बालिका.
(चाल) पाहून तुझें तें ध्यान, अहा मम भान
हरपुनी गेलें, हरपुनी गेलें.
मन माझें सुमन जाहलें, तेधवां

घेतलें हळुंच तोडून
ठेविलें सुमन मन जपून, बालिके !
कल्पनाहि याची गमते
ठावी न तुझ्या हृदयातें, बालिके !
हृदयांत चाललें गान,
करितसे तुजसि बेभान, बालिके!
मधुगान गावया छंद
लावी तव प्रेमानंद, बालिके !
आनंद जाहला कसला ?
ठावा त्या फुलझाडाला, बालिके !
फुलझाडांच्या छकुल्यांना
तव सुमनापरि सुमनांना, बालिके !
तूं नाद अतां हा सोडी,
बघ भरत चालली परडी, बालिके !
तुज कसा येइना शीण
सारखी फुलें तोडून, बालिके !

(चाल) तोडुनी, अशीं हीं फुलें सांग सोनुले
काय करिशील! काय करिशील !
तूं कवणा अर्पियशील, बालिके !

कां गुंफुनि झुबकेदार,
सुमनांचा सुंदर हार, बालिके !
घालुनी हार हा असला
सजविशील तूं कवणाला, बालिके?
सजविशील प्रेमें ज्याला
तो सुमनामाजी सजला, सांवळा.
तोडिशी फुलें ज्यासाठीं
तो स्वयेंच गे जगजेठी पातला.
उद्यानांतिल झाडांत
झाडांच्या पानफुलांत सांवळा.
राउळें फुलांचीं छान
करि त्यांतच मुरलीगान, सांवळा.
कोकिळा गातसे गान
तेंच असे प्रभुचें गान. बालिके !
या गोड प्रभूच्या गानें
जणुं टाळ्या पिटिती पानें नाचुनी
ऐकूनी प्रभूचें गान
कां कंठ येइ गहिंवरुन, बालिके !
कां कंठ तुझा गहिंवरला ?
अश्रूंच्या मौक्तिक माला ढाळिशी.
तूं सांग सांग गे छकुले
स्वारस्य काय तुज कळलें, यांतलें?

कां गुंफुनि झुबकेदार,
सुमनांचा सुंदर हार, बालिके !
घालुनी हार हा असला
सजविशील तूं कवणाला, बालिके?
सजविशील प्रेमें ज्याला
तो सुमनामाजी सजला, सांवळा.
तोडिशी फुलें ज्यासाठीं
तो स्वयेंच गे जगजेठी पातला.
उद्यानांतिल झाडांत
झाडांच्या पानफुलांत सांवळा.
राउळें फुलांचीं छान
करि त्यांतच मुरलीगान, सांवळा.
कोकिळा गातसे गान
तेंच असे प्रभुचें गान. बालिके !
या गोड प्रभूच्या गानें
जणुं टाळ्या पिटिती पानें नाचुनी
ऐकूनी प्रभूचें गान
कां कंठ येइ गहिंवरुन, बालिके !
कां कंठ तुझा गहिंवरला ?
अश्रूंच्या मौक्तिक माला ढाळिशी.
तूं सांग सांग गे छकुले
स्वारस्य काय तुज कळलें, यांतलें?

(चाल) वाहिला, तुझा आनन्द, फुलांचा छन्द
कुणाच्यासाठीं ? कूणाच्यासाठीं ?
केवळ परमेशासाठीं हेंच ना !

* * *     * * *

(शा. वि.)

जाऊनी मग मन्दिरीं निरखिलीं
मूर्तीस जीं वाहिलीं,
उद्यानांतिल तीं क्षणांत कुसुमें
कण्ठींच कोमेजलीं.
प्रेमानें परडींतुनी नयनिंच्या
बाले तुवां ढाळिलीं,
अश्रूंचीं सुमनें युगान्त प्रभुनें,
प्रेमें हृदीं ठेविलीं.

पंचवटी–नाशिक, ता. १२–८–१९३०



## चि. शरच्चंद्रास— ( गझल )

बाहू उभारुनीयां
वद काय दाखवीशी ?
काऊ चिऊ रवानें
वदुनी मुदें मनाशीं.

समजूं तरी कशी ही
तव मूक गोड बोली,
नुमजे अजूनि बाळा
कवणा दिगंतकालीं.

ब्रह्मांड हें हराया
वद काय धांव घेशी ?
सृष्टीसतीस मोदें
कां प्रेमभेट देशी ?

बाहू उभारुनीयां
ग्रासावया रवीला,
कां अंजनीसुताच्या
सुचवीत बाललीला !

---

* चि. शरच्चन्द्र (बेबी सरवटे.)

रमला वसंत येथें
देऊनि वैभवासी,
सोडूनि जात आतां
कां थांब थांब म्हणशी.

रुसली निसर्ग-देवी
ज्योत्स्नापटासि ल्याया,
सजलासि काय बाळा
शरदासि बोलवाया.

शरदांत चांदणें तें
किति शांत सौख्यदायी,
निज बालकासि प्रेमें
जणुं जोजवीत आई.

निजवी जगत् निशा ही
करी खेळ रंजनाचा;
परि नंदलाल जागा
श्रीरंग द्वारकेचा,

घेऊनि गोपगोपी
वेणूसि वाजवीत,
तो नंदलाल रमला
आनंद मूर्तिमंत.

आनंद अंतराळीं !
आनंद विश्वरंगीं !
आनंद ब्रह्मनादीं !
त्या काय भेट देशी ?

आनंद पूर्ण ब्रह्म
सकलासि तोषणारा
आनंदरूप तूंही
सुखशांतिचा निवारा.

झणूकार नादतांना
वाजे जसा झणाणा;
माई सरस्वतीच्या
अंकावरील वीणा.

तव गोड दर्शनानें
प्रतिभेसि नाचवावें,
प्रेमी कवी–जनांच्या
कवितेसि भूषवावें,

हृदयासि तोषवाया
कवनामृतासि द्यावे,
घुटके अशा रसाचे
रसिकांसि घेउं द्यावें;

हंसण्यांत सौख्य तैसें
रुदनांत दाखवावें,
झणिं स्वैर बागडावें,
तुज एवढेंच ठावें.

फुलत्या फुलांत जैशी
तव हांसण्यांत जादू,
खुलत्या दिलास वाटे
जणुं हाच प्रेमसिंधु.

करितां कशासि शोध?
जगिं हेंच दिव्य प्रेम,
यालाच देव म्हणती
देऊळ प्रेमधाम.

अस्तित्व हें प्रभूचें
जगतासि दाविण्यातें,
तूं बालरूप धरुनी
आलासि काय येथें

"जगतांत देव नाहीं"
बकती कितीक जीव,
त्यांची खरी करावी
बाळा तुंवाचि कींव.

"जगतांत नाहि शांती
विश्रांतिही कशाची !"
तव एक गोड पापा
देईल साक्ष याची.

* * *
* * *

त्या हास्यरूप लाटा
आनंदसागराच्या
येतां कुशींत मोदें
माता वसुंधरेच्या

व्हावीं कशासि रत्नें
रत्नाकरातळींचीं ?
वायूसवें रमावें
ही ठेव ना जिवाची !

किरणें मृदू रवीचीं
हातीं धरूनि बाळा
रमशी रवीसवेंही
हा काय रम्य चाळा !

रविबाळ तो नभींचा
लडिवाळ तूं जिवाचा
लागे म्हणूनि चाळा
कां खेळ खेळण्याचा !

चि. शरच्चंद्रास

खेळा अखंड खेळ
परि सावधान व्हावें
भानूपरि तुंवाही
तव तेज वाढवावें.

मुरार--ग्वाल्हेर, ता. ४-८-१९३१



## नाइलाज

(राग—यमन गझल)

लावुनी नेत्रबाणातें
खेंचिलें म्यां कमानीला
परंतु मागच्या मागें
कुणी गे हात हा धरिला ?

सोडना सोड गे सखये
जाऊं दें प्रेमदूताला,
सुखाचे बोल परिसाया
अधिर हा जीव गे झाला.

तुवां ते ओठ दाबूनी
हास्यही कोंदिलें आंत,
गुलाबी गाल परि हंसती
हंसू दे त्यास गालांत.

दावितां वदन त्यांना मी
खपेना काय गे तुजला ?
पदर हा ओढुनी पुढती
लपविशी काय चंद्राला ?

फुलांची शेज म्यां केली
महालीं शांत झोंपाया,
तोंच हें जाल कांटेरी
कशी आलीस पसराया ?

सुखाचें गान मी गाया
विण्याची छेडितां तार,
मण्यांना ओढिशी कां गे
तारही होइ बेसूर.

दिलाची शुद्ध ही गंगा
चालली शांत ओघानें,
न्हाउं दे तींत गे त्यांना,
घेउं दे गोड आचमनें.

उसळत्या भावना हृदयीं
कुठवरी सांग मी बोलूं ?
कशाला ढीग सोन्याचा
एकट्या गुंजिनें तोलूं ?

जरी तूं सारखी आली
सुखाच्या आडवाटेला,
नशीबीं दिवस सोन्याचा
कसा येईल उदयाला ?

सखी तूं एक जीवाची
मला गे ठाव दे धरणी,
कशी या प्रेम द्वैतानें
मला ही लाविली झुरणी.

अखेरी सांगणें माझें
जिवाचें एक वेल्हाळे !
सुखानें नांद त्याजवळी
सोडुनी सर्व हे चाळे.

नशिराबाद, ता. १९-४-१९२९

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ४६७८.

## पिचकारी

(चाल–अधरिं धर मुरली)

नका तुम्हि उडवूं, उडवूं पिचकारी,
    भ्रांति मम फिटली हो सारी.
नका तुम्हि उडवूं, उडवूं पिचकारि,
    पुनित मज केलें गिरिधारी.
नका तुम्हि उडवूं, उडवूं पिचकारी,
    छेदिली विषय–दृष्टि सारी.
नका तुम्हि उडवूं, उडवूं पिचकारी,
    पुरे या प्रेमाच्या लहरी.
नका तुम्हि उडवूं, उडवूं पिचकारी,
    जाहले गोपी मी दुसरी.
जगीं मी येईं, येईं कुणासाठीं ?
    नसे संसारविषासाठीं.
जन्म मी घेईं, घेईं कुणासाठीं ?
    सासुच्या कां सुनेसाठीं !
जन्म मी घेईं, घेईं कुणासाठीं ?
    पतीच्या कां पत्नीसाठीं !
जन्म मज देई, देव कशासाठीं ?
    पित्याच्या कां लेकीसाठीं !

जगीं मी येईं, येईं कुणासाठीं
प्रभू तुमच्याच भेटिसाठीं.
अतां मी नोहे, नोहे ती पहिली
लोकनिंदेला जी भ्याली.
अतां मी नोहे, नोहे ती पहिली
सासुच्या जांचाला भ्याली.
अतां मी नोहे, नोहे कवणाची,
पित्याची लेक न मातेची.
अतां मी नोहे, नोहे कवणाची
पतीची पत्नी प्रेमाची.
अतां मी नोहे, नोहे कवणाची
कुणी वा राणी रायाची
एक मी आहे, जीवाभावाची
दासि ही अपुल्या चरणाची.

जळगांव, ता. १७-१०-१९२४

---

## तो दिवस

(चाल—भूपती खरे ते)

तीं प्रशांत किरणें येति सदा नयनाशीं,
क्षण माझेजवळी क्षणीं जाति तिजपाशीं.

तो निरोप कथुनी मूक एकमेकांचा,
बघ कसा चालवी खेळ दिव्य प्रेमाचा.

कुणि म्हणो तयांना पुष्पबाण नयनींचे,
मदनाचे शरसंधान जिव्हारीं जाचे.

फुलुनियां मोगरा जसा दरवळे गंध,
मज गमे जणूं कीं आनंदाचा कंद

(चाल) त्यासाठीं बनलों आतां मधुकर,
मधु प्रेमरसा चाखाया आतुर,
तोंवरी सारखी लागे हुरहुर,

जें हृदयिं उमटलें तेंच मुखें वदण्याचा,
उगवेल कधीं तो दिवस गडे सोन्याचा.

मुरार-ग्वाल्हेर, ता. १३–९–१९३१

## गोड समजूत (चाल- जमाना आगया खोटा)

तो:-कशाला घालिशी बाले !
अशी तूं खालती मान ?
जरा वरती करी वदना,
रीत ही सोड नादान.

ती:-धरूनी हात माझा कां
सोडितां आपुलें शील!
नका हो ! काय हें भलतें !
जन तुम्हां काय म्हणतील !

तो:-मनाच्या भावना माझ्या
तुझ्याही जाहल्या गोड,
तेंच ना शील दोघांचें ?
मिळाली गोड ही जोड.

ती घडीची प्रेमभेटीची
प्रथमची तीच शाबास;
तिनें या जातिबंधाचे
टाकिले तोडुनी पाश.

'बनविला,' तूंच म्हणशीना,
'मनुज हा देवबापानें'?

'परी या निर्मिल्या जाती
बहुविधा सूज्ञ(!)मनुजानें.'
कितीदां तूंच म्हटलें ना
'प्रेम हें आंधळें बाई' ?
अशा या अंध प्रेमाला
मुळींही सोंवळें नाहीं.

* * *          * * *

जगाची रीत सांडूनी
प्रेम हें ओंवळें मानी.
सोवळें बाजिरावाचें
नेसली 'जान मस्तानी !'

मुंबई, ता. २३–७–१९२९

## दैवाची गत

( चाल–कोंकणिं ग वस्ती)

कशि ग दैवानं गत केली !

ललाटिंचा लेख वाचु मी कैसा !
ब्रह्माचा ठाव घेउं तरि कैसा !
खेळ परि दिसे तूझ्या नशिबाचा,
कोर कुंकवाची पुसकटली. कशि ग दैवानं—

पाहिल्या ग तुझ्या हाताच्या रेषा,
ठाव्या नच सामुद्रिक ज्योतिषा,
बोलुं कशी भवितव्याची भाषा?
बांगडी करींची बघ टिचली. कशि ग दैवानं–

शरिराचं मोल झालं द्रव्यानं,
द्रव्याची रास वरिली मोहानं,
जिवन तव झालं ग प्रीतीवांचुन,
जिवाची लाही मम झाली. कशि ग दैवानं—

कशाचं सुख कशाची शांती !
पडली उगिच तुला ही भ्रांती !
जिवाला नाहिं जरा विश्रांती,
सोन्याचि ग माती बघ झाली. कशि ग दैवानं–

कळ्या उमलल्या तुझ्या नवतिच्या.
सुरकुत्या दिसती मुखावर पतिच्या,
स्मशानीं गेल्या गोंवऱ्या त्याच्या,
चिता हृदयाची धगधगली. कशि ग दैवानं—

टिटविची टिव टिव येई कानीं।
चुकचुके पालहि ती अपशकुनी
वृत्ति तव बावरली दिनवाणी
खचित धुळधाणी तव झाली, कशि ग दैवानं-



## अक्षय्य तृतीया*

(चाल—ठेवुनी प्रेम)

चालल्या फुगड्या, फुगड्या वा पिंगा
रंगवी खेळ एक दंगा.
घालुनी पिंगा, ( पक पक आवाज़ )
खेळती रम्य खेळ आज.
घेउनी हातीं, हातीं टिपऱ्यांना
गाति ठेक्यावर गीतांना.
वाजती टिपऱ्या, टप टप आवाजें
ताल त्या गाण्याला साजे.
घालुनी वेण्या, पाठीवर लांब
खोविलें त्यांत धनू[1] छान
केतकी रंग कवळ्या पानाला
शोभला नागिण वेणीला.
खरोखर वाटे, वाटे जीवास
पातल्या वनदेवी खास.

---

* खानदेशांत या सणाचे दिवशीं माहेरवासणी नानापरी खेळ खेळतात. सदरहू भाग कवीच्या "मंजुळामाधव" या खंडकाव्यांतला आहे, १ गव्हाचीं कोंवळीं रोपटीं,

बांधिला झोल', झोला झाडाला
मैत्रिणी घेती झोक्याला.
घेउनी झोके, झोके भरपूर
हवेनें येइ भरुनि ऊर.
तयांचीं गाणीं, गाणिं कर्णमधुर
रमविती रसिकांना फार.
तयांचीं गाणीं, काव्य मूर्तिमंत
घेतसे हृदयाचा अंत.
नाहिं गणमात्रा, मात्रांचा बंध
नसे त्या शास्त्रांचा गंध.
गाउनी गाणीं, भाऊरायाला
रंक वा राव असो त्याला.
बंधुप्रेमानें, गाति त्यांस गाणीं
तोषवी प्रेमाची वाणी.
"भाऊच्या हातीं, सोन्याची पवची
उपरणीं त्याला भरजरिचीं.
भाउच्या हातीं, काठी चांदीची
शेति घरिं बारा जोडयांची.
भाउ ग माझा, दिसे ऐटदार
सुभ्याचा मोठा सरदार"
बोलती बोल, जीवाभावाचे
परंतू ते बिनअर्थाचे
अर्थ गाण्याचा, समजावूं काय? ........

—स ?                                  ( शा. वि. )

झाला बालपणीं विवाह अपुला
केव्हां स्मरेना मला,
कैसा सावध होउं मीं, प्रियसखे !
तीं अष्टकें ऐकुनी ?
द्यावा दोष भटास काय म्हणुनी
ब्राह्मण्य आहे कुठें ?
आशीर्वादच भोंवला मज पुरा
' कुर्यात सदामंगलम् '

* * *    * * *

होतें वाटत मन्मनीं पुढति ही
नांदेल जोडी कशी,
पत्नी कोण ? पती कशास म्हणती ?
जाणीव याची नसे;
लावूनी हळदी मुदें सजविलीं
हीं बाहुला बाहुली,
रूढी खेळलि खेळ हा क्षणभरी,
झालें जगाचें हंसें.

कोठें, सांग, तुला भिवूनि दडलें
सौंदर्य, वा सद्गुण !
ब्रह्मयाला तरि काय वाण पडली
माझ्याच वेळीं अशी ?
पाहूनी तुज कोणता वद मनीं
संतोष मानूं तरी ?
घालूनी कर कंठीं चालवुं, बये !
संसार नौका कशी ?

*     *     *

कुंकू लावुनी जो तुवां कधितरि
सन्मान मातें दिला,
याचा मोबदला त्वरीत चल घे
ही सोडचिठ्ठी तुला.

जळगांव ता. १९–९–२६

## कशाची संक्रान्त ? (अभंग)

संक्रान्तीचा सण आला बंधुराया !
आलों तुज द्याया तीळगूळ.
मुखावरी दिसे निराशा समूळ
"घेई तीळगूळ" बोलत मी.
हातावरी चार हालव्याचे दाणे
अश्रु-सिंचनानें झाले ओले.
वरूनी आनंद आंत दुःखराशी,
गोडी मग कैशी हालव्यांत?
संक्रांतीचें देणें काय हें अमोल,
नाहींतरी मोल काय त्याचें ?
मातीचें गाडगें घेऊनीया आली,
देऊनीया गेली खापरासी.
अमुच्या नशिबीं खापराचा लाभ,
स्वातंत्र्याचा भाग नामशेष !
नामशेष ऐशी आमुची संक्रान्त
पडली नां भ्रांत जनालागी.
घेऊनीया तीळगूळ वाटताती
मुखें बोलताती "गोड बोला !"

गोड बोल कैसे ! निराशेचे बोल
हृदयींचे हाल सांगवेना.
कशाचा पाडवा ? कशाची संक्रान्त ?
चालला आकांत चहूंकडे.
कशाचा हालवा आणि तीळगूळ ?
कल्पनेचा खेळ चालतसे.
तीळगूळ ऐसा जातां मुखावाटे,
तिळतीळ तुटे काळीज हें.
कांटेरी लगाम देतसे यातना
तरी अश्व दाणा खात असे.
हातामधें नाहीं काडीचीही सत्ता,
दुष्मानांच्या लत्ता हेंच भाग्य !

मुम्बई, ता. १७-१-१९३०.

## मळ्यांत जातांना (चाल येउं दे करुणा)

( "मंजुळामाधव" या अप्रसिद्ध खडकाव्यांतील उतारा )

ठेउनी प्रेमें, प्रेमें फडक्यांत,
भाकरी-भाजीचा बेत.
चुरियले वरती, वरती मोलाचे,
जोंधळी, पापड उडदाचे.
टाकिलें वरती, तिखट मसाल्याचें,
ओतलें तेल करडईचें.
सुटाया पाणी, पाणी तोंडाचें,
लोणचें घालुनि आंब्याचें.
आठवण करुनी, करुनि घातली ती,
भाजि ही सगबहिणीघरची[1].
बांधुनी मोदें, त्वरित न्याहरीला,
घरधनी माधवरायाला.
नेसली अंगीं, अंगि आवळून,
नाटिचें[2] लुगडें तें छान.

---

१ सख्या बहिणीप्रमाणेंच एक मानलेली बहीण.
२ सुती लुगड्याची जात.

लाविलें भालीं, भालिं कुंकुमाला,
भूषवी पतिच्या भाग्याला.
घातले पायीं, पायीं पायतणा,
दाविते भीती पापिजना.
कटीला खोंवी, खोंवि टोंकदार,
निंदणीचें खुरपें प्यार.
डोकिवरि पाटी, पाटि न्याहरीची,
धरियली वाट शिवाराची.
मंजुळा चाले, मार्ग आक्रमीत,
मन तिचें पतिच्या हृदयांत.
मंजुळा चाले, सांवरीत पदर,
फडफडे वाऱ्यानें फार.
मंजुळा चाले, चाले तंद्रींत,
माधवाचें चिंतन करित,
मंजुळा चाले, चाले मोदांत,
वाटलें मनीं अकस्मात,
मनाला वाटे, उशिर आज झाला,
सूर्य हा डोईवर आला.
क्षणाला वाटे, खंतचि जीवाची,
टळलि कां वेळ न्याहरीची !
काय तरि बाई ! मी मोठी नष्ट !
चालले तिकडे किति कष्ट.

उगिच मी गेलें, पाटिल वाडयांत,
गमविला वेळ बोलण्यांत.
कुठुनि ती आली, आलि 'ठमाबाई,'
उशिर हा म्हणुनि मला होई.
लागली शीव, आतां शहराची,
दिसे बाभूळ एकदांची.
मळ्याची खूण, खूण अतां दिसली,
कानिं ही लल्कारी आली.
मारी लल्कारी, लल्कारी कोण ?
मंजुळे, तुझा पंचप्राण.
मारि लल्कारी, "मोटेच्या बैला,
चालरे, ¶आवड हा भरला."
मारि लल्कारी, "ढेलाऱ्या बैला,
चालरे, आवड हा भरला."
"सांवळ्या, तूंही, चाल जरा वेगें,
उमलवी केळीचे पोगे.
तुम्हीं हा घ्यारे, घ्यारे शाबास !
हिरवळ्या §दादरचा घांस.
तुम्हा दोघांना, तगडे बनवीन,
घालुनी सरकीचें दान.

---

¶ तीन वाफ्यांचे एक पाटगे, व वीस पाटग्यांचा एक [आवड.

§ विहिरीच्या पाण्यावर वाढलेला कडबा.

सांवळ्या तुजला, आणिक मोतीला,
रेशमी गोंडे माथ्याला !
ह्याती राहो, राहो तुम्हाला,
§सवारूं पुढच्या पोळ्याला.
तुम्हां दोघांची, डौलदार शिंगें,
बांधु मग त्यांना बाशिंगें.
केतकी अपुली, फुलेल तो गहिरी,
केवडे लाविन मग नम्री.
सांचलें सूत, सूत मंजुळेचें,
बारडोली-चरख्यावरचें.
विणू मग झूल, झूल तुम्हांलागीं,
रंगही देऊं नारिंगी.
फुलांचा छान, छान बहर आला,
आपुल्या पळस पांझऱ्याला.
गाउनी गान, गान माधवानें,
फेडिलें कष्टाचें उसनें.
गाउनी गान, पुरवियले गोड,
सांवळ्या मोतीचें कोड,
जाहली वेळ, वेळ न्याहरीची,
बघतसे वाट मंजुळेची.

---


§ शृंगारू.

सोडली मोट, मोट एकदांची,
अरोळी दिधली जोराची.
चालरे सोन्या! सोन्या †बारकरी,
सोडुनी दे आतां बारीं.
चाल रे, सोन्या ! सोन्या ! लवलाही,
सांवळ्या मोतीला नेई.
तयांना आधीं, आधि पाज पाणी,
वाजवी शीळ गायि गाणीं.
"नेउनी बांध, आंब्याच्या खालीं,
तयांना पाचोळा घाली.
अरे पण अजुनी, अजुनि मंजुळाई,
कशी ती आज येत नाहीं."
मनाशीं म्हणतो, म्हणतो फिरफिरुनी,
बघतसे तो माळ्यावरुनी.
मंजुळा माझी, दूर दिसे कां ती,
खेडच्या त्या ‡सगरावरती.
नव्हे ती कोणी, कोणि तरी पोर,
जातसे $लौकीच्या पार.
अरे ही येई, चाहुल कानांत.
फडफडे कडबा शेतांत.

---

†पाणी वळविणारा; ‡पाय रस्ता; $ओढयाचें नांव.

मंजुळा आली, आली कडब्यांत,
गुदगुल्या झाल्या हृदयांत.
उतरला खालीं, माळोच्यावरुनी,
रंगला आवडत्या गानीं.
तोंच ती आली, जीवाची राणी,
मंजुळाई गोजिरवाणी.
टपकती बिंदू , वदनीं घामाचे,
मोल तें श्रम-सौंदर्याचें.
हांसली मोदें, सांवरीत पदर,
चावुनी दंतीं तो अधर.
तीच मग बोले, बोले लाजून ........



## लाजे नभीं चंद्रमा !

( शा. वि. )

केव्हांची मुखचन्द्र ठेवुनि सखी,
अंकिं प्रियाच्या मुदें;
पाहे सस्मित त्याकडे हुरळुनी
ती प्रेमगोष्टी वदे.

गंगेचें जल त्यावरी पसरली
ज्योत्स्ना चहूं बाजुला;
चंद्राचें प्रतिबिंब शांत डुलतें,
पाहूनि दिग्मंडला.

तो हांसून वदे मधेंच तिजला
" हा चंद्रमा कोणता ? "
प्रेमानें बसली हळूच टिचकी
गालावरी ती तदा.

झालें काय असें ? म्हणूनि कच ते
येती कपोलिं त्वरें.
आपोआप कशी पहा भर पडे
सौंदर्यसाजीं बरें !

* * * *

गंगेच्या जलदर्पणांत नभिंचा
तो चंद्र पाही मुखा.

चंद्राला इहलोकिंच्या पुनपुन्हा
पाहे परी सारखा.

तो हांसून वदे तदा बघ गडे
कैसा तुझा चंद्रमा !

पाहूनी सखये तया दुरुनिया
लाजे नभीं चंद्रमा!

नाशिक, ता. ३०-३-३२.



## प्रेमसंगम. (चाल–संगमाचीच.)

पूर्णा मिळालि तापीप्रती,
सखे हा सुरम्य संगम किती ॥ धृ० ॥
किती किती हा हृदयंगम
बघुनियां मधुर संगम
येती विचार लहरी अती । सखे ग सुरम्य—
एकमेकिंच्या हृदयांतुन
चाले प्रेमाचं मधुगायन,
प्रेमास प्रेम अर्पिती । सखे ग सुरम्य—
कशि प्रेमाचि रित याहुन
प्रित दोघिंचि ही पाहुन,
जाहली गुंग मन्मती । सखे ग सुरम्य—
बघ तरी सये साजणी
ही सुरम्यता पाहुनी,
तरुलता मुदें डोलती । सखे ग सुरम्य—
सूर्यबिंबाचा कंपित पट
जलिं लावीयला मळवट,
शोभे ललाटपटलीं किती । सखे ग सुरम्य—

---

('प्रेमसंगम' या पुस्तकांतून)

सभोंवतींहि हिरवळ अती
तिच्या घेऊनि पदरा सती,
किति चालली ठुमकत गती । सखेग सुरम्य –

* * * *

रविकरांचा शालु भरजरी
लेवुनिया ग अंगावरी,
मग निघे जणूं गजगती । सखे ग सुरम्य—
सभोंवतीं बाल निर्झर
धांवती किती झरझर,
तापी आईप्रती अळविती । सखे ग सुरम्य—
" आइ अम्हासि टाकुन गडे
चाललीस कोणीकडे, "
कडेवरी बसुनिया जाती । सखे ग सुरम्य—
तिरावरील झुडुपें किती
आइप्रती झणीं बिलगती,
प्रेमपान्हा पिउनियां घेती । सखे ग सुरम्य—
अंगुली करीं धरियली
प्रेम बोला बोलत चालली,
सर्वे घेउनि पूर्णावती । सखे ग सुरम्य—
हा सुरम्य संगम गडे
शिकवितो जगाला धडे
प्रेमाचि पूर्णता किती । सखे ग सुरम्य—

पुण्यपावन सरिता सती
पुर्वपुण्याइनें भेटती
दैवि प्रेमाचि जडली प्रिती। सखे ग सुरम्य—

बघुनिया हा संगम गडे
येति समाजहृद्यें पुढें
पुढें व्हावी कोणती गति। सखे ग सुरम्य—

चहुंकडे पसरली बेकी
कुणिकडे निमाली एकी!
एकमेकांवरी रूसती। सखे ग सुरम्य—

बेकिबेकींचा हलकल्लोळ
कसा जमेल बाई मेळ,
झाली नादान मानव जाती। सखे ग सुरम्य—

सांग तरी सख्या संगमा
तुझ्या एकीचें सारस अम्हां
या अजाण जीवांप्रती। सखे ग सुरम्य—

हृदिं नितांत उठती रव
अशा एकींचें बा वैभव—
कधिं नांदेल या भारतीं। सखे ग सुरम्य—

जळगांव, सन १९२७

## रणमर्द शाहीरास— (गझल)

अजुनि कैशी झोंप घेशी हिंद वीरा अशा घडीला ?
उघडि आधीं ही समाधी, हिंदमाता वदे कुणाला ?
तुणतुण्याची तार चढवी
गा पवाडे डफाऽऽऽवरी
जन चेतवुनि वीररसा देइ प्रेरणा,
शाहिरा हें अव्हान तुजला
याच गानाच्या निनादें
दशदिशा दुमवून दे,
नव तेज अंगिं बाणवुनी आण खेंचुनी,
शाहिरा त्या तुझ्या यशाला.
ज्या यशानें मायभूला
भूषवीलें अवनींतलीं,
रक्षणास तिच्या रक्षियला आर्य धर्म ना !
धन्य त्यांच्या पराक्रमाला.
तुणतुणें तल्वार हातीं
हतबलासी उठविलें,
रणमर्द गडी सिंहगडीं प्राण अर्पुनी
सिंह तान्हा लढोनि गेला.

जळगांव.

# लढाईवर जातांना

( चाल–सत्यभामा रुसली....लावणी. )

सखि ! सोड गडे बाहुपाश कंठिंचा,
रणशिंग वाजतें निरोप दे भाग्याचा,
सखि ! ढाळुं नको विरहाश्रू घळघळा,
विरहाचा वांटेकरी धन्य जाहला.

सुख माझें जें तेंच सौख्य ना तुला!
संसारिजनांचा हा तर सुखसोहळा !
जरि तुजसि गमे दुःखाचा हा क्षण !
किति गोड गडे सुखदुःखाचें मीलन!
मुखकमलातें स्कंधीं मम ठेवुन,
कुठवरी राहशील उभी अशी अवलुन?
सखि सोबतची तुझी जिवाची प्यार
ती कटयार घाली विळखा माझा तर !
नवमास तुझे भरत येति साजणी
नवबाळ जिवाचा होइल तोंवर धनी.
सखे आणुं नको, किंतु मात्र तव मनीं.
हृदयांत ठेव ती देवि कुलस्वामिनी.
तूं वीर जननि ना ? भीति कशी मनिं वसे ?
पोटचा गर्भ तुज वेडावुनि हंसतसे,

स्थिर चित्तानें विचार करितो असा,
फोडीन व्यूह शत्रूचा पुढती कसा!

* * * * * *

चल सोड अतां जाऊं देइ सत्वर,
शिवरायाचा बघ दूत उभा बाहिर.
किति अधिर पहा अबलक घोडा गुणी,
मम वाट बघतसे स्वार व्हावया झणीं.
तो ऐक पुन्हां झडत दुंदुभी रणीं,
देतसे धीर मज देवि कुलस्वामिनी.
ती विजयश्री आणिन मी खेंचुनी,
अम्हि वीर मराठे सदा यशाचे धनी.

नाशिक, ता. २८-३-१९२७

## प्रेम आणि परमेश्वर. ( अभंग )

देव म्हणूनियां कशासी म्हणावें
त्यासी संबोधावें दिव्यप्रेम.

जीवात्म्याची झाली समता ज्या ठायीं
तोच असे पाही परमेश.

तोच असे देव तेंच दिव्य प्रेम,
त्यालाच श्रीराम अभिधान.

तोच गोपाळाचा सांवळा श्रीरंग
सखा पांडुरंग तोच असे.

कपींच्या प्रेमाचा बांधियेला सेत
त्यांत रघुनाथ दिसतसे.

गोपांच्या प्रेमाचा गुंफियेला गोफ
गोपालाचें रूप त्यांत दिसे.

संतांच्या प्रेमाची निघालीसे दिंडी
मन पांडुरंगीं रमतसे.

पंढरपूर, सन १९२३

---

## बंदिशालेंत !* (चाल–शिवरायाचा सिंह सिंहगडीं)

राष्ट्रदेवते प्रणाम करितों प्रेमनिर्भरें तुला
देइ गे आशीर्वचना मला
कशास वाहूं बोल फुकाचे भारत माते तुला ?
बोलही खोल पहा चालला
कितिक लोटांगणें घालणें तुझिया चरणांवर
नको भक्तीचें अवडंबर
(चाल)चहुंकडे पसरलें जाळें परदास्याचें अवकाळीं
त्यांतही पहा हे आले दुर्विलास अमुच्या भाळीं
चालले नाटकी चाळे हे तुझिया नांवाखालीं
परन्तु सारे तुडवुनि पायीं मिळविन मी मातिला
देइ गे आशीर्वचना मला
छत्रपतींचे छत्रपतीही झाले अवनीवर
वाहुनी शिरकमलें तुजवर
तव चरणाचे दास जाहले अढळपदीं सत्वर
धन्य ते पुण्यश्लोक नरवर
यशोगान गाउनि तयांचे तुष्ट होऊं कां मनीं
कोरडे धन्यवाद देउनी

---

* दे. भ. जतींद्रनाथ बाबूंचे मातृभूमीस उद्देशून शेवटचे उद्गार !

(चाल) कां यशोगान गावोनी शूराचि मान्यता भेटे?
जणु बांगडयाच फोनोच्या वाजतात ऐसें वाटे
छे नको नको ते चाळे मनिं मंगल आशा दाटे
मनांत चाले एक घोषणा; मुक्त करिन मी तुला
देइ गे आशीर्वचना मला

किताब पदव्या लाथेसरसे, देइ झुगारुनि दुर
तुझ्या मी पायींचा किंकर
नकोत तीं सुन्दर व्याख्यानें, तुजपुढतीं धावया
सतत मी तयार राबावया
पक्वान्नाचे मधुर घांस—छे नको नको कल्पना !
दीन जनतेच्या त्या यातना
चाल) स्वातंत्र्य प्राप्तिच्या साठीं जाउनिया कारागारीं
ये किती करुण किंकाळया बंधुंच्या हृदयविदारी
तें अन्न बंदिशालेचें गमतसे म्हणूनि विषारी
त्या अन्नाचा त्याग करुनि मी पडलों गे धरणिला
प्राण हा कंठीं बघ पातला !!

# हळदी घाटाचें युद्ध

त्या हळदि घाटाचें युद्ध,
कुणाला नाहिं कुणाची शुद्ध
कुरुक्षेत्राचं भारती युद्ध,
आणावं ध्यानीं, हा जी जी.

चहुंकड सेना अटोकाट,
शिराया नाहिं जराशी वाट,
फौजेचा अशापरी हा थाट,
दोन पक्षाला.

रजपुत धन्य लढणार,
पाठिवरि ढाल कटीं तल्वार,
होउनी घोड्यावरती स्वार,
झुंजती भारी.

सरदार शौर्यानें धुंद,
अंगिं चिलखत पगडि शिरबंद.

४५१८.

डफ तुणतुणं पावलं भंग;
कुंठली वाणी.

* * * * * *

( मिळवणी )

केली किती युद्धें घनघोर
स्वातंत्र्यरणवीर
भरतभूमिवर
"करुनिया स्वतंत्र मेवाडास"
प्रतापी प्रतापसिंह, शाबास!
जाहला वंद्य सर्व जगतास.

समाप्त

( "प्रतापी प्रतापसिंह" या पोवाड्यांतून )

REFBK-0004718
REFBK-0004718